# सुचना

**नाशिक शहराच्या प्रारुप सुधारित विकास योजनेमधील बदलांचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिध्दीकरण**

क्रमांक :- जा.क्र. नावि/प्रासुवियो-नाशिक/कलम २८(४)/१६५८, दि. १६.११.२०१५

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६, (यापुढे "उक्त अधिनियम" म्हणुन संबोधलेले) चे कलम २१ (४ क) नुसार नियुक्त अधिकारी (यापुढे "उक्त अधिकारी" म्हणुन संबोधलेले) तथा सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक यांनी उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) नुसार प्रारुप सुधारित विकास योजना, नाशिक (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" म्हणून संबोधलेले) दि. २३.५.२०१५ चे सुचनेव्दारे प्रसिध्द केली. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग १ नाशिक विभागीय पुरवणी जून ४-१०, २०१५ रोजी नागरिकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजनेवर विहीत मुदतीत प्राप्त सुचना व हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) नुसार स्थापन झालेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त अधिकाऱ्याकडे दि. ०३.११.२०१५ रोजी सादर केला ;

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेला अहवाल नियुक्त अधिकारी यांनी मान्य करुन, उक्त प्रारुप विकास योजनेत सुधारणा/बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यासाठी ठराव क्र. २, दि. ०४.११.२०१५ पारित केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २८(४) खालील तरतूदीनुसार उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुदयात केलेले बदल नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजनेच्या मसुदयात नियुक्त अधिकारी यांनी कलम २८(४) नुसार केलेल्या बदलांची सुची परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे, नागरिकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर बदल दर्शविणारा प्रारुप विकास योजनेचा नकाशा खालील नमुद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसाच्या कालावधीकरिता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून, www.nashikcorporation.in या संकेतस्थळावरसुध्दा उपलब्ध आहे ;

१) सहसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक
१ ला मजला, प्रशासकीय इमारत, आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड

२) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, नाशिक

नाशिक

दि. १६.११.२०१५

(प्रकाश भुक्ते)
नियुक्त अधिकारी,
सुधारित विकास योजना, नाशिक
तथा
सहसंचालक, नगर रचना,
नाशिक विभाग, नाशिक